सकाळ
पिंपरी-चिंचवड TODAY पुणे, सोमवार, ९ डिसेंबर २०२४

कॉलेज कट्टा

# ‘सर्व्हिकल कॅन्सर’बाबत जागृती

■ श्रुती गांधी (रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसी, चिंचवड)

श्री जैन विद्या प्रसारक मंडळ संचालित चिंचवड येथील रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी ‘सर्व्हिकल कॅन्सर अवेअरनेस’ विषयावर व्याख्यान झाले. डॉ. नूतन वंजारी (गायनेकोलॉजिस्ट इम्पिरियल हॉस्पिटल, चिखली) यांनी सर्व्हिकल कर्करोग हा महिलांमध्ये होणारा गंभीर आजार असल्याचे सांगितले. सर्व्हिकल कर्करोग कसा होतो? या कर्करोगाची कारणे? महिलांमध्ये होणाऱ्या लक्षणांची ओळख आणि उपचार याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. सीरम इन्स्टिट्यूट येथील सतीश कुलकर्णी (रीजनल मॅनेजर), कृष्णा हेगडे (एरिया मॅनेजर), प्रशांत शिंदे (टेरियटरी मॅनेजर), अधिकराव संदे (टेरियटरी मॅनेजर) आदी उपस्थित होते. त्यांनी सर्व्हिकल कर्करोग जागरुकता कार्यक्रम विविध संस्था, सरकार यांच्याकडून कसा राबवला जातो ? या विषयी माहिती दिली. बाजारात उपलब्ध कॅन्सर लसीकरण व प्रतिबंधात्मक उपायांबद्दलही त्यांनी माहिती दिली. प्रा. सुचिता खोत यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. हर्षदा पाटील यांनी आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश धारीवाल, कार्याध्यक्ष शांतीलाल लुंकड, ऑनररी जनरल सेक्रेटरी ॲड. राजेंद्रकुमार मुथा, संस्थेचे कोषाध्यक्ष प्रकाशचंद चोपडा, प्राचार्य डॉ. सचिन फेगडे यांचे मार्गदर्शन लाभले.



RASIKLAL M. DHARIWAL COLLEGE OF PHARMACY
D-PHARM
Chinchwad Station, Pune-411 019.

PRINCIPAL
RASIKLAL M. DHARIWAL
COLLEGE OF PHARMACY
Chinchwad Station, Pune-411 019